# महाराष्ट्र शासन
## अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे कार्यालय

पत्रव्यवहाराचा पत्ता :- प.पु.डॉ.केशव बळीराम हेगडेवार भवन इमारत, पहिला माळा, मॅक्सस मॉलच्या मागे, अमृतवाणी रोड, भाईंदर (प)- ४०१ १०१. तालुका-ठाणे, जिल्हा- ठाणे.

दुरध्वाी क्र. ०२२-२८१८५९१६ ईमेल आयडी-tahmirabhayander@gmail.com


क्र.महसुल/ कांदळवन/कावि-१९५/२०२० दिनांक :२७/०१/२०२०

89

प्रति,
मा.उप वरनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई

विषय : Destruction of mangroves, illegal land filling and construction of Chawl (10 rooms) at Government Land, Shivneri, Village Rai, Bhayander West, by Land/Chawl Mafia Pravin Tiwari and Meghnath Patil

संदर्भ : कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडे अर्जदार श्री.जतीन दधीच यांनी दाखल केलेली तक्रार अ.क्र.८९

कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडे श्री.जतीन दधीच यांनी दाखल केलेली तक्रार या कार्यालयास ई-मेलव्दारे प्राप्त झालेली आहे. (तक्रार अ.क्र.८९ )

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने मा.अध्यक्ष, कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीने वनविभाग, पोलीस निरीक्षक, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, मिरा भाईंदर महानगरपालिका व तक्रारदार यांचेसोबत स्थळपहाणी करुन त्याबाबचा अहवाल देण्याबाबत निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने दि.०३/०१/२०२० रोजी स्थळपाहणी निश्चित करणेत आली.

त्यानुसार स्थळपाहणी दरम्यान या कार्यालयाकडील नायब तहसिलदार, पोलीस अधिकारी-कर्मचारी, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी, मंडळ अधिकारी भाईंदर व संबधित तलाठी यांनी अर्जदार यांचे समवेत विषयांकित जागेची दि.०३/०१/२०२० रोजी स्थळपहाणी केली असुन मंडळ अधिकारी भाईदर यांनी त्यांचेकडील पत्र जा.बा.नि.क्र.१२८/२०१९-२० दि.०३/०१/२०२० अन्वये खालील प्रमाणे एकत्रित स्थळपहाणी अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

स्थळपाहणी दरम्यान मौजे राई येथील सरकारी स.नं.१११ मध्ये अनाधिकृत अतिक्रमण करुन चाळीचे बांधकाम दाखविण्यात आले. सदरचे बांधकाम चाळ स्वरुपाचे पत्र्याचे बांधकाम असुन एकूण १० खोल्या पैकी काही खोल्यांचे बांधकाम महानगरपालिका यांचे कडुन निष्कासित करण्यात आलेले आहे. उर्वरित अनाधिकृत बांधकाम महानगरपालिका यांचेकडील अतिक्रमण पथकाकडुन निष्कासित करणे आवश्यक वाटते. सदर बांधकाम कांदळवन पासुन ५० मिटर आत आहे, परंतु आजरोजी कांदळवन नुकसान झालेले दिसुन येत नाही. तरी याबाबत वन विभागाचे अभिप्राय आवश्यक ठरत आहेत. तसेच सदर ठिकाणी मोठया प्रमाणात अनाधिकृत झोपडयांचे बांधकाम झाल्याचे दिसुन आलेले आहे. सदर बांधकामाबाबत महानगरपालिके कडुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

सदर तक्रारीबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.महसूल/कांदळवन/कावि-१९५/२०२० दि.२२/०१/२०२० अन्वये प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्रत्यक्ष स्थळपाहणी व अर्जदार यांचे मागणीनुसार नमुद ठिकाणी प्रस्तुत बांधकाम पूर्णपणे तोडणेबाबतची कारवाई तात्काळ करणेबाबत कळविले आहे.

तरी प्रकरणी कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती यांचे निर्देशानुसार वरीलप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करीत आहोत. सोबत उपस्थित असलेल्या सदस्यांची यादी, Geo Tagging सह फोटो व मंडळ अधिकारी भाईंदर यांचेकडील मूळ अहवाल सादर केलेला आहे.

(डॉ. नंदकिशोर देशमुख)
**अपर तहसीलदार मिरा-भाईंदर**

प्रत : मा.जिल्हाधिकारी ठाणे (महसूल शाखा) यांजकडे माहितीस्तव सविनय सादर


उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 286
दिनांक 4/3/2020
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक